**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0334 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 30/07/2026 22:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 28/07/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 30/07/2026

**Time From (वेळेपासून):** 13:32 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:12 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 30/07/2026 **Time (वेळ):** 21:51 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 033

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 30/07/2026 21:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सामाजिक न्यायविभागाच्या ,इमारतीच्या तळमजल्यावरील, इतर मागास बहुजन कल्याण, विभागाचे कार्यालयात धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): यशवंत विश्वनाथ बोरसे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9527427065

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विशाल सुनिल चौधरी | | | 1. 5,नंदनवन नगर,पंचवटी महादेव मंदिराजवळ,जळगांव ,धुळे शहर, धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 40 भारतीय चलनी नोटा | 20,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 39 वर्षे,पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे एक वर्षापासुन कार्यरत आहे. दि.28.07.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार निखिल संदिपराव ठाकरे यांनी धुळे ला.प्र.वि. कार्यालयात समक्ष हजर राहुन त्यांचेकडे इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी विशाल चौधरी हे लाचेची मागणी करीत असल्याचे सांगितल्याने आम्ही मा. मुख्याध्यापक; शासकिय तांत्रिक विद्यालय, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडुन श्री. रोहित महादेव जाधव, निदेशक व श्री. अभिजित अशोकराव रणवरे, निदेशक यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची, पोकॉ. मकरंद पाटील व पोकॉ. रामदास बारेला यांची ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार निखिल संदिपराव ठाकरे यांची त्यांना ओळख करुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव निखिल संदिपराव ठाकरे, वय 33 वर्षे, ठेकेदार, रा.692/अ, रामनिवास, दुध डेअरी प्लॉट, मोराणे, साक्री रोड, ता. जि. धुळे, असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगुन त्यांची लेखी तक्रार त्यांच्या हस्ताक्षरात लिहुन दिली ती पुढील प्रमाणे ''मी सुशिक्षित बेरोजगार अभियता असुन विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाकरीता राबविण्यात येणाऱ्या वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजने अंतर्गत मौजे खंडलाय बु. ता.जि. धुळे येथील हाटकर वस्ती मध्ये पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया होवुन मला 10 लक्ष किमतीच्या कामाचा ठेका मिळाला असुन सदर कामाचा मा. सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, धुळे कार्यालयाकडुन जा.क्र. 568/26-27, दि.15.04.2026 अन्वये कार्यारंभ आदेश मिळाला आहे. सदरचे काम मी पुर्ण करुन ग्रामपंचायत खंडलाय बु. ता.जि. धुळे यांना दि.07.07.2026 रोजी हस्तांतरीत करण्यात आले आहे. मी केलेल्या कामाचे शाखा अभियता यांचेकडुन वेळोवेळी मोजमाप होवुन मोजमाप पुस्तिकेत कामाच्या मोजमापाची व कामाच्या मुल्यांकनाची नोंद करुन मोजमाप पुस्तिकेची प्रत व इतर कागदपत्र कामाचे बिल अदा करण्याच्या कार्यवाहीकरीता इतर मागास बहुजन कल्याण विभाग, धुळे यांचेकडे दि.23.07.2026 रोजी जमा करण्यात आले होते. त्याच दिवशी मी विशाल चौधरी, मागास बहुजन कल्याण अधिकारी यांची त्यांचे कार्यालयात जावुन भेट घेवुन मी केलेल्या कामाचे बिल मला अदा होणेकरीता विचारपुस केली असता त्यांनी मला, ''तुम्ही केलेल्या कामाचे 10 लाखाचे बिल काढण्याकरीता मला 3 टक्के प्रमाणे 30,000/- रुपये द्यावे लागतील, त्याशिवाय बिल मिळणार नाही'' असे मला सांगितले आहे.

मला विशाल चौधरी यांना त्यांच्या मागणी प्रमाणे 30,000/- रुपये लाच देण्याची अजिबात इच्छा नाही. परंतु मी त्यांना पैसे दिले नाही तर ते मी केलेल्या कामाचे बिल अदा करण्याची कार्यवाही करण्यास विलब करतील. माझा विशाल चौधरी, इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी यांचे सोबत कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वाद विवाद नाही.

मी आज दि.28.07.2026 रोजी विशाल चौधरी यांना भेटण्यास त्यांच्या कार्यालयात जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपल्या विभागामाफत कायदेशीर कारवाई करावी ही विंनती आहे'' बाबत लेखी तक्रार दिली.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी विशाल चौधरी यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी विशाल चौधरी यांची धुळे शहरातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे कार्यालयात भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्या दुचाकीने तक्रारदार व पंच नं. 01 जाधव यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच जाधव असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 जाधव, तक्रारदार यांनी सांगितलेली हकिगत

व डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषण एेकुन विशाल चौधरी यांनी तक्रारदार यांचेशी त्यांचे कामाबाबत चर्चा केली. परंतु तक्रारदार व विशाल चौधरी यांच्यात झालेल्या संभाषणात चौधरी यांचेकडुन लाचेच्या रकमेबाबत स्पष्टता होत नसल्याचे दिसुन आले. तेव्हा तक्रारदार यांना विशाल चौधरी यांनी फोन करुन तक्रारदार यांना कोठे आहेत बाबत विचारणा करुन पुन्हा कार्यालयात भेटण्यास बोलविले. त्यानंतर पुन्हा तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना विशाल चौधरी यांची त्यांचे कार्यालयात भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्या दुचाकीने तक्रारदार व पंच नं. 01 जाधव यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच जाधव असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 जाधव व तक्रारदार यांना हकिगत विचारली असता त्यांनी तक्रारदार व विशाल चौधरी यांच्यात त्यांच्या कामाबाबत चर्चा झाली, चर्चे दरम्यान चौधरी यांनी त्यांच्या टेबलावरील कॅल्क्युलेटरवर 2.5 असे अंक दाबुन ते अंक तक्रारदार यांना दाखविले. तेव्हा त्यांच्यात तडजोड होवुन चौधरी यांनी दोन टक्क्याप्रमाणे लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याची तक्रारदार व पंच जाधव यांनी सांगितलेल्या हकिगतीवरुन तसेच डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रित झालेले संभाषण एेकुन आमची व पंचांची खात्री झाली. परंतु सदर पडताळणी कार्यवाही दरम्यान विशाल चौधरी यांनी लाचेच्या रकमेचा उल्लेख केलेला नसल्याने व लाचेसंबंधी त्यांच्या साहेबांच्या नावाचा उल्लेख केल्याने आम्ही दि.29.07.2026 रोजी पुनश्च तक्रारदार व पंच जाधव यांना तक्रारदार यांचेसोबत विशाल चौधरी व त्यांचे वरिष्ठ सहायक आयुक्त श्री फड यांची भेट घेण्यास पाठवुन पडताळणी करण्याचा निर्णय घेवुन झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला आहे.त्यानंतर दि.29.07.2026 रोजी तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी विशाल चौधरी यांची धुळे शहरातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे कार्यालयात भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्या दुचाकीने तक्रारदार व पंच नं. 01 जाधव यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच जाधव असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 जाधव व तक्रारदार यांना हकिगत विचारली असता त्यांनी तक्रारदार व विशाल चौधरी यांचेत त्यांचे कामाबाबत चर्चा होवुन चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी साहेब कार्यालयात केव्हा येतील अशी विचारणा केली. तेव्हा त्यांनी त्यांची काही गॅरंटी नाही असे तक्रारदार यांना सांगितले. तेव्हा विशाल चौधरी यांनी त्यांच्या मोबाईलवरुन फड साहेबांना फोन करुन तक्रारदार आल्याचे सांगुन तक्रारदार बिलाबाबत विचारणा करीत असल्याचे सांगुन त्याचे काय करायचे अशी त्यांना विचारणा केली. त्यानंतर विशाल चौधरी यांनी आता वीस आहेत का आणलेले? अशी तक्रारदार यांना विचारणा करुन तक्रारदार यांचेकडुन 20,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याची हकिगत सांगितली. सदर हकिगतीवरुन व डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रित झालेल्या संभाषणावरुन विशाल चौधरी यांनी तक्रारदार यांचेकडुन 20,000/- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केल्याची आमची व पंचांची खात्री झाली. त्यानंतर झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला आहे.त्यानंतर आम्ही दि.30.07.2026 रोजी सापळा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी 500/- रुपये दराच्या 40 नोटा, असे 20,000/- रुपये हजर केले. त्यानंतर सदर नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 जाधव अशांना तक्रारदार यांच्या दुचाकीने विशाल चौधरी यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 अभिजित रणवरे, पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे, पोहेकॉ. संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, पोकॉ. रामदास बारेला, पोकॉ. प्रविण पाटील असे खाजगी कारने रवाना होवुन धुळे सामाजिक न्यायभवनाचे इमारतीत व आवारात जावुन परिसरात आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पोकॉ. मकरंद पाटील यांनी तक्रारदार यांचेकडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. तेव्हा आम्ही पंच जाधव यांना विचारणा करता तक्रारदार यांनी विशाल चौधरीं यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. तेव्हा त्यांच्यात चर्चा झाली. चर्चे दरम्यान विशाल चौधरी यांनी तक्रारदार यांचेकडे हाताच्या इशाऱ्याने पैशांची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या डाव्या हाताने पॅन्टच्या डाव्या खिशातुन लाचेची रक्कम काढुन विशाल चौधरी यांना 20,000/- रुपये आहेत असे सांगुन त्यांच्या समोर धरली असता त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांच्या समोरील टेबलच्या उजव्या ड्रॉव्हर मध्ये ठेवुन घेतले. त्यानंतर त्यांच्यात पुन्हा बिलाबाबत चर्चा झाली. तेव्हा सदर लाचेची रक्कम आमचे सुचनेवरुन पंच नं. 02 अभिजित रणवरे यांनी ड्रॉव्हर मधुन काढुन ताब्यात घेतली. त्यावेळी आमचे सुचनेवरुन पोकॉ/मकरंद पाटील यांनी विशाल चौधरी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर ला.प्र.वि, धुळे कार्यालयात येवुन आज रोजी झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. शा प्रकारे तक्रारदार निखिल ठाकरे यांनी मौजे खंडलाय बु. ता.जि. धुळे येथील हाटकर वस्ती मध्ये पेव्हर ब्लॉक बसविण्याचे 10 लाखाचे बिल अदा करण्याची कार्यवाही करण्याकरीता दि.28.07.2026 व दि.29.07.2026 रोजी विशाल सुनिल चौधरी,

इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, धुळे यांनी तक्रारदार निखिल संदिपराव ठाकरे यांच्याकडे पंचासमक्ष तडजोडीअंती दोन टक्क्याप्रमाणे 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आज दि.30.07.2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान 16.21 वाजता त्यांचे कार्यालयात तक्रारदार यांचेकडून स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

hemantkumar sahebrao bhamare (I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**